**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. अरूण काशिनाथ गोळे — अपीलकर्ता
मु.पो.वालथ (बामणेवाडी), ता.जावळी, जि.सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, जावळी, ता. जावळी, जि.सातारा

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, जावळी, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८१ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०.१२.२००८ |
| ३ | **उपस्थित** | |
| | **अपीलकर्ता** | श्री. अरूण काशिनाथ गोळे<br>मु.पो.वालथ (बामणेवाडी), ता.जावळी, जि.सातारा |
| | **अपिलीय प्राधिकारी तथा** | तहसीलदार, जावळी, ता. जावळी, जि.सातारा<br>श्रीमती नीता सावंत-शिंदे |
| | **जन माहिती अधिकारी तथा** | निवासी नायब तहसीलदार, जावळी, जि. सातारा<br>श्री. बजरंग नारायण कोंडे |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९.३.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ५.५.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ८.५.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ८.६.२००६ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-**क**) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, जावळी यांनी अपुरी माहिती दिली, त्याबद्दल रू.५७५०/- शास्ती अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, जावळी यांनी केली. त्यांनी ती रक्कम भरल्याची पावती आपल्याला मिळाली नाही. शिधापत्रिकेवर पंधरा लिटर केरोसीन दिल्याची नोंद असून पावती अकरा लिटरची आहे, शासनाचा दर रु. ९.५० पै. असताना विक्री १०/- रूपयांनी असा गैरप्रकार आहे, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. अरूण काशिनाथ गोळे यांनी केली.

तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी विहित मुदतीत माहिती दिली नाही. संबंधित रास्त भाव दुकानदाराकडून वेळेत माहिती उपलब्ध न झाल्यामुळे देता आली नाही, ऊर्वरित माहिती प्राप्त करून देत आहोत, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, जावळी श्री. बजरंग नारायण कोंडे यांनी केले.

श्री. गोळे सन २००२ ते २००५ या काळातील महिनावार माहिती मागितल्याचे म्हणत असले तरी त्यांच्या मूळ अर्जात सन २००४-२००५ ची माहिती मागितली आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, जावळी श्रीमती नीता सावंत-शिंदे यांनी निदर्शनास आणले. श्री. गोळे यांनी ते मान्य केले. सन २००२-२००५ ची माहिती श्री. गोळे यांना देण्यात आली. तथापि प्रती शिधापत्रिका, प्रति महिना माहिती देण्याची मागणी त्यांनी नंतर अपिलात केली आहे. विहित प्रक्रियेनुसार ते योग्य नाही, तरीही माहिती देण्यात येत आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, जावळी श्री. व्ही. एम. कुचेकर यांनी उपलब्ध माहिती विहित मुदतीत दिली नाही म्हणून त्यांना शास्ती करण्यात आली. तथापि सन २००६ मध्ये त्यांची बदली सोलापूर जिल्ह्यामध्ये झाल्यामुळे शास्तीच्या वसुलीबाबत जिल्हाधिकारी, सोलापूर यांना कळविण्यात आले आहे, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, जावळी श्रीमती नीता सावंत-शिंदे यांनी केले.

मूळ अर्जाव्यतिरिक्तची माहिती अपिलात मागून ती न मिळाल्याची तक्रार करण्याची अपीलकर्त्याची कृती योग्य नाही. मूळ अर्जानुसार विहित मुदतीत माहिती दिली नसल्याबद्दल अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, जावळी यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना शास्ती केली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार अशी शास्ती करण्याचे अधिकार अपिलीय प्राधिकारी यांना नाहीत. तथापि ही शास्ती आयोगाने केली आहे, असे समजण्यात येत असून त्याच्या वसुलीबाबत जिल्हाधिकारी, सोलापूर यांना आयोगाच्या निदेशानुसार अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, जावळी यांनी अवगत करावे, असे आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. आयोगाने दिलेल्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, जावळी यांनी आयोगाला सादर करावा.

३. शास्तीची रक्कम रू.५७५०/- श्री. व्ही.एम.कुचेकर, नायब तहसीलदार यांच्याकडून डिसेंबर २००९ च्या जानेवारी २०१० मध्ये देय असलेल्या वेतनातून वसूल करुन ती ००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८०० इतर जमा रकमा (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१) या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी करून आयोगाला अहवाल सादर करावा. याबाबतची नोंद त्यांच्या सेवानोंद पुस्तकात व गोपनीय अहवालात घेण्यात यावी.

**पुणे**
**दि. ३०.११.२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.यशवंत विनायक रायरीकर
ओंकार कॉलनी गल्ली नं.२, पॉप्युलर नगर जवळ,
वारजे माळवाडी, पुणे-५८ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
बारामती तहसील कार्यालय, ता.बारामती, जि.पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
बारामती तहसील कार्यालय, ता.बारामती, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८२७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.६.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.यशवंत विनायक रायरीकर
ओंकार कॉलनी गल्ली नं.२, पॉप्युलर नगर जवळ, वारजे माळवाडी, पुणे-५८

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार,
बारामती तहसील कार्यालय, ता.बारामती, जि.पुणे श्री.हिम्मत खराडे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
बारामती तहसील कार्यालय, ता.बारामती, जि.पुणे श्री.बी.जे.गोरे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८.११.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ९.१.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ४.२.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

७/१२ उताऱ्यामधील नोंदीच्या संदर्भातील कायमस्वरूपी जतनाच्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती आपल्याला मिळालेल्या नाहीत. महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण पुणे, येथे दाखल असलेल्या दाव्यात त्यामुळे आपल्याला आवश्यक पुरावा सादर करता येत नाहीत, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.यशवंत विनायक रायरीकर यांनी केले.

सन १९९३ मध्ये झालेल्या आदेशाची नक्कल श्री.रायरीकर यांनी मागितली होती. याबाबत परिश्रमपूर्वक शोध घेऊनही कागदपत्रे सापडलेली नाहीत, याची कल्पना श्री.रायरीकर यांनी वेळोवेळी देण्यात आली आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, बारामती तहसील कार्यालय, बारामती, जि.पुणे व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, बारामती तहसील कार्यालय, बारामती, जि.पुणे यांनी संबंधित कागदपत्रांचा शोध घेण्याबाबत केलेल्या परिस्थितीच्या पुराव्यासह सादर केले. श्री.रायरीकर यांना ७/१२ वरील वहिवाट संदर्भातील प्रमाणित प्रत देण्यास आपण तयार आहोत. तसेच त्यांनी महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे केलेल्या अपिलाच्या सुनावणीच्या वेळी साक्षीदार म्हणून हजर राहण्यास आम्हाला कळविल्यास आपण उपस्थित राहू, असे जन माहिती अधिकारी श्री.बी.जे.गोरे व अपिलीय प्राधिकारी श्री.हिम्मत खराडे यांनी लेखी व तोंडी नमूद केले. संबंधित ७/१२ ची प्रमाणित प्रत श्री.रायरीकर यांना पाठविल्याचे जन माहिती अधिकारी श्री.बी.जे.गोरे यांनी दि.३०.६.२००९ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले. आयोगाने दिलेल्या मौखिक आदेशानंतरही पुन्हा

दि.१८.९.२००९ रोजी आयोगाने विचारणा केल्यानंतर अपिलीय प्राधिकारी यांनी अहवाल पाठविला. संबंधित कागदपत्रांचा अभिलेखापाल व कोतवाल यांनी अभिलेख कक्षामध्ये पुन्हा शोध घेतला असताही आढळ झाले नाहीत, तसेच कुळकायदा संकलनाकडील फेरिस्त यादी पाहता सदरच्या आदेशाचा क्रमांक फेरिस्त यादीत आढळ होत नाही, असे अभिलेखापाल यांचा अहवाल असल्याचे विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, बारामती तहसील कार्यालय, बारामती, जि.पुणे यांनी अभिलेखापालाच्या अहवालाच्या प्रतीसह दि.३१.१०.२००९ रोजी आयोगास अवगत केले.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे

**पुणे**
**दि.१६.११.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. महादेव केदारी शेळके
मु. पो. डोणौली, ता. शाहूवाडी, **अपीलकर्ता**
जि. कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** शिक्षणाधिकारी, **उत्तरवादी**
जिल्हा परिषद, कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी तथा**
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), वेतन व भविष्य निर्वाह निधि पथक
कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८५० / २००९ / कोल्हापूर |
| २ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** - निनाई हायस्कूल निनाई परळे च्या सन १९९८ ते २००९ मधील सेवकमान्यतेच्या प्रोफॉर्म नं. १ च्या छायाप्रती. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. महादेव केदारी शेळके यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. कोणतीही कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे:-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर निकाली काढण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.३०-११-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. महादेव केदारी शेळके
मु. पो. डोणोली, ता. शाहूवाडी,
जि. कोल्हापूर
**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** शिक्षणाधिकारी,
जिल्हा परिषद, कोल्हापूर
**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा**
शिक्षणाधिकारी (माध्यमिक), वेतन व भविष्य निर्वाह निधि पथक
कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८५० / २००९ / कोल्हापूर |
| २ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -** निनाई हायस्कूल निनाई परळे च्या सन १९९८ ते २००९ मधील सेवकमान्यतेच्या प्रोफॉर्म नं. १ च्या छायाप्रती. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. महादेव केदारी शेळके यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. कोणतीही कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे:-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर निकाली काढण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३०-११-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम ,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे ४११ ००१

श्री.ए.एस.पाटील ... **अपीलकर्ता**
७८८/२, नळभाग,
हिरा सायकल शॉपसमोर,सांगली ४१६ ४१६

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** जिल्हा आरोग्य अधिकारी, ..... **उत्तरवादी**
जिल्हा परिषद, सांगली

**जन माहिती अधिकारी तथा**
अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८५१/२००९ सांगली |
| २ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**<br><br>श्री.ए.एस.पाटील यांच्या वैद्यकीय पर्यवेक्षक पदाचे आरोग्य सहायक पदावर समायोजनाबाबतच्या सर्व टिप्पण्या व यासंदर्भातील शासन निर्णय. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.ए.एस.पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जनमाहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा

निर्णय इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३०-११-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. शिवाजी रामचंद्र नाडे
स. नं. ७८, इंदिरा वसाहत,
संगमवाडी, खडकी, पुणे - ३

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** महाप्रबंधक,
बँक ऑफ महाराष्ट्र क्षेत्रिय कार्यालय,
"यशोमंगल", एफ सी रोड, पुणे - ५

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** सहायक महाप्रबंधक,
बँक ऑफ महाराष्ट्र क्षेत्रिय कार्यालय,
"यशोमंगल", एफ सी रोड, पुणे - ५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८५६ / २००९ / पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २२.९.२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १.१०.२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०.१०.२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०.११.२००९ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -**<br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र - अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. शिवाजी रामचंद्र नाडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे ज्या सार्वजनिक प्राधिकरणातील जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे निर्णयाविरुध्द अपील केले आहे, ते

सार्वजनिक प्राधिकारण हे केंद्रिय माहिती आयोगाच्या कार्यकक्षेतील असल्याने त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करता येणार नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहेत.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि:२७-११-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. जितेंद्र कृष्णराव नाईक निंबाळकर
मु. पो. वाठार निंबाळकर, ता. फलटण,
जि. सातारा

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** गटविकास अधिकारी,
पंचायत समिती फलटण, जि. सातारा

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** कक्ष अधिकारी,
पंचायत समिती फलटण, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८६३ / २००९ / सातारा |
| २ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७.९.२००९ |
| ३ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** - अपीलकर्त्याने माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र - अ) छायाप्रत अपिलासोबत जोडलेली नसल्याने मूळ माहितीचा बोध होत नाही. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. जितेंद्र कृष्णराव नाईक निंबाळकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, तसेच जनमाहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. ३०-११-२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.राजेश भिवाजी कांबळे
संध्यानगरी ई-५, कृपा बंगला, विशालनगर, जगताप डेअरी, पुणे-२७ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता (वि.यो.क्र.२),
बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता (वि.यो.क्र.२),
बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८८ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता (वि.यो.क्र.२),
बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.प्रविण गेडाम

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता (वि.यो.क्र.२),
बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे श्री.भारत मोहिते

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ८.६.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १२.७.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०.७.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ८.९.२००६ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१२.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्याने दि.१७.२.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली. अपीलकर्ता हे सुनावणीसही गैरहजर होते.

अपीलकर्ता श्री.राजेश भिवाजी कांबळे यांनी मागितलेल्या माहितीबाबत शुल्क भरण्यास विहित मुदतीत त्यांना कळविण्यात आले. त्यांनी माहिती न घेता अपील केले. त्यांच्या सुनावणीसाठी तीनवेळा तारखा देऊनही ते गैरहजर राहिले. माहितीच्या संदर्भात त्यांनी एकदाही संपर्क साधला नाही. तथापि, त्यांना माहिती पाठविण्यात आली, असे जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता (वि.यो.क्र.२), बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी सांगितले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२६.११.२००९**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. शरद रामण्णा शेट्टी
प्लॉट क्र. १४, प्रेमप्रभा, गणराज मंगल कार्यालयाजवळ,
वीरभद्र नगर, बाणेर, पुणे.

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** नगर अभियंता,
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर,
पुणे - ५

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** विकास अभियंता (बा. नि.),
पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर,
पुणे - ५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९० / पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८.४.२००६ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.५.२००६ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.६.२००६ |
| ५ | **माहिती** - मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र- अ) सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दि. १२.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' मध्ये या अपीलाचा समावेश होता. या कार्यालयात अपीलकर्ता गैरहजर होता.

माहितीसाठी शुल्क भरण्याबाबत दि. २४.५.२००६ रोजी पत्रान्वये कळवूनसुध्दा अपीलकर्त्याने शुल्क भरलेले नाही, असे जन माहिती अधिकारी तथा विकास अभियंता (बां. नि.), पुणे महानगरपालिका यांनी अपीलकर्त्यास पाठविलेल्या दि. २४.५.२००६ च्या पत्रावरुन दिसून येते. अपीलकर्ता श्री. शरद रामण्णा शेट्टी यांनी आवश्यक तर माहिती त्यानुसार शुल्क भरुन प्राप्त करुन घ्यावी.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२०-११-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रभाकर सोपानराव करचे
मु.पो.सामथळी, ता.फलटण, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार फलटण,
ता.फलटण, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार फलटण,
ता.फलटण, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९० / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२१.१.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार फलटण,
ता.फलटण, जि.सातारा श्री.हिम्मत खराडे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार फलटण,
ता.फलटण, जि.सातारा श्री.संभाजी हेरवाडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १०.१.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १.३.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** |
|---|---|
| | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२१.८.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर असल्याने दि.२१.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली. अपीलकर्ता सुनावणीलाही गैरहजर होते.

अपीलकर्ता श्री.प्रभाकर सोपानराव करचे यांनी जन माहिती अधिकाऱ्यांकडून कोणतीही माहिती मिळाली नसल्याचे व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपिलाची दखल घेतली नसल्याचे राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जात व लेखी निवेदनात म्हटले आहे.

श्री.करचे यांनी उल्लेख केलेला अर्ज जन माहिती अधिकाऱ्यांकडे दिलेला नाही. तसेच प्रथम अपिलाचा अर्जही नागरी सुविधा केंद्रामध्ये दिलेला असल्यामुळे आपल्या कार्यालयाकडे नोंदविलेला नाही. तथापि, राज्य माहिती आयोगाकडील सुचनेनंतर माहिती तयार करून विनामूल्य देण्याची व्यवस्था करण्यात आली. मात्र श्री.करचे यांनी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, फलटण यांच्याकडे जवळजवळ ११ अर्ज केले असून विस्तृत माहिती मागितली आहे. काही माहिती त्यांना वेळोवेळी देण्यात आली असली तरी आपण दारिद्र्यरेषेखाली असल्याचे नमूद करून वडिलांचा दारिद्र्यरेषेखालील दाखला जोडून ते माहिती मागत असतात. त्यांच्या मागणीनुसार वेळोवेळी त्यांना कागदपत्रांचे निरीक्षणही करू देण्यात आले आहे. तथापि त्यांना नि:शुल्क माहिती हवी असून ती देण्यासाठी रुपये १ लाख ७४ हजार इतका खर्च येईल. एवढी अनुदान रक्कम आपल्या कार्यालयाकडे उपलब्ध नाही, त्यामुहे वरिष्ठ कार्यालयाकडे याबाबत मार्गदर्शन मागितले आहे, असे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, फलटण, ता.फलटण, जि.सातारा श्री.संभाजी हेरवाडे, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, फलटण, ता.फलटण, जि.सातारा श्री.चंद्रकांत दुदुसकर, विद्यमान

अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, फलटण, ता.फलटण, जि.सातारा श्री.हिम्मत खराडे, तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा -तहसीलदार, फलटण, ता.फलटण, जि.सातारा श्री.श्रीरंग तांबे यांनी पूरक कागदपत्रांसह सविस्तर लेखी निवेदन सादर केले. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सादर केलेले निवेदन व त्यांनी सादर केलेली कागदपत्रे पाहता श्री.करचे विस्तृत स्वरूपात माहिती मागत आले आहेत. दारिद्र्यरेषेखालील व्यक्तीला निःशुल्क माहिती देण्याच्या सवलतींचा अवाजवी लाभ ते उठवीत आहेत, असे कागदपत्रांवरून स्पष्ट होते. तरीही विषयांकित अपिलाप्रमाणे वेळोवेळी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी त्यांना माहिती देत आले आहेत. माहिती देण्यासाठी प्रमाणाबाहेर रक्कम खर्च करावी लागणे हाही सार्वजनिक पैशाचा अपव्ययच ठरतो, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, महाराष्ट्र

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२७.११.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.रामदास बापूराव दरेकर
मु.पो.जेजुरी. ता.पुरंदर, जि.पुणे
अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार,
पुरंदर तहसील कार्यालय, जि.पुणे
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा**
निवासी नायब तहसीलदार, पुरंदर तहसील कार्यालय, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९०६/पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.११.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रामदास बापूराव दरेकर
मु.पो.जेजुरी. ता.पुरंदर, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार,
पुरंदर तहसील कार्यालय, जि.पुणे श्री.देवदत्त ठोंबरे

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
पुरंदर तहसील कार्यालय, जि.पुणे श्री.सुनिल चंदनशिवे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१३.१२.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.०४.०३.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.६.२.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.०३.०४.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.३०.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्याने दि.१७.११.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

जमिनीत कूळ वहिवाट व खंड सदरी नोंद धरण्याबाबतची आपल्या मागणीनुसार कार्यवाही होत नाही व सन १९९८-९९ या सालचे गा.न.नं.१ ईच्या नकला दिल्या जात नाहीत, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.रामदास बापूराव दरेकर यांनी केली. उपलब्ध माहिती श्री.दरेकर यांना देण्यात आली. त्यांची मागणी कूळ वहिवाट व खंड याची नोंद करण्याबाबतची असून ती प्रशासकीय कार्यवाहीची बाब आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, पुरंदर तहसील कार्यालय, ता.पुरंदर, जि.पुणे श्री.सुनिल चंदनशिवे व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, पुरंदर तहसील कार्यालय, ता.पुरंदर, जि.पुणे श्री.देवदत्त ठोंबरे यांनी केले.

श्री.दरेकर यांच्या प्रशासकीय कार्यवाहीच्या मागणीचा विचार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत करता येणार नाही. त्यांच्या मागणीनुसार अतिक्रमण अर्जासंबंधीच्या नकलाबाबतचा शोध घेऊन दि.२५.११.२००९ पर्यंत नकला द्याव्यात अथवा त्याबाबतचा खुलासा करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, पुरंदर तहसील कार्यालय, ता.पुरंदर, जि.पुणे श्री.देवदत्त ठोंबरे यांनी दि.२१.११.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला अहवाल सादर केला. 'तहसील कार्यालयाचे अभिलेख कक्ष अद्यावतीकरण सन २००७-०८ मध्ये करण्यात आले असून पुरंदर तालुक्यातील सर्व गावांचे

नमुने १ ते ६ व ९ ते २९ कालबाह्य (क वर्गवारी) झाल्यामुळे नष्ट करण्यात आले आहेत,' असे नमूद करून त्यांनी सोबत फेरिस्त यादी जोडली आहे. हा अहवाल लक्षात घेता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि३०.११.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.उल्हास कमलाकर अग्निहोत्री
'शारदा', गुलमोहर पथ, लॉ कॉलेज रोड, पुणे-४ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पब्लिक रिलेशन्स ऑफिसर,
आय.एस.बी.एम., अशोका प्लाझा, विमाननगर, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा माहिती अधिकारी,
आय.एस.बी.एम., अशोका प्लाझा, विमाननगर, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९२७ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.६.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.उल्हास कमलाकर अग्निहोत्री
'शारदा', गुलमोहर पथ, लॉ कॉलेज रोड, पुणे-४

**अपिलीय प्राधिकारी** तथा पब्लिक रिलेशन्स ऑफिसर,
आय.एस.बी.एम., अशोका प्लाझा, विमाननगर, पुणे श्री.अभय गायकवाड

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७.१२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १६.२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२६.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी गैरहजर राहिल्यामुळे दि.१९.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आय.एस.बी.एम. हे महाविद्यालय असून शासनाच्या निर्णयानुसार सर्व शैक्षणिक संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू आहे, तरीही जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवर माहिती दिली जात नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.उल्हास कमलाकर अग्निहोत्री यांनी केले.

इंटरनॅशनल स्कूल ऑफ बिझिनेस अँड मिडिया ही संस्था खाजगी ट्रेनिंग कंपनी आहे व ती कंपनी कायद्यानुसार नोंदणीकृत आहे. केंद्र अथवा राज्य शासनाकडून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या कोणतीही मदत संस्थेला मिळत नाही. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम २(एच) मधील तरतुदीनुसार ही संस्था सार्वजनिक प्राधिकरण ठरत नाही, त्यामुळे हा अधिनियम संस्थेला लागू नाही, तरीही अपीलकर्ता श्री.उल्हास कमलाकर अग्निहोत्री आमच्या संस्थेत वारंवार प्रवेशासंदर्भात भेटून सारखे त्रास देत असतात, असे लेखी व तोंडी प्रतिपादन संस्थेचे प्रतिनिधी श्री.अभय अशोक गायकवाड यांनी केले. तसेच संस्थेत फक्त प्रशिक्षण दिले जाते पदवी वा पदविका दिली जात नाही असेही त्यांनी नमूद केले. माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ लागू नसल्याचे त्यांचे प्रतिपादन मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३०.११.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे - ४११ ००१

श्री. एस.नरिंदरसिंग चढ्ढा
रेनबो हॉटेल डेव्हलपर्स, १२-अे, एव्हरग्रीन बिल्डिंग,
गुरू गोविंदसिंग मार्ग, खार रेल्वे स्टेशन, मुंबई-५२ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, मावळ
ता. मावळ, जि. पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
मावळ, ता. मावळ, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९३० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३०.४.२००९ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. एस.नरिंदरसिंग चढ्ढा
रेनबो हॉटेल डेव्हलपर्स, १२-अे, एव्हरग्रीन बिल्डिंग,
गुरू गोविंदसिंग मार्ग, खार रेल्वे स्टेशन, मुंबई-५२

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, मावळ
ता. मावळ, जि. पुणे श्री. सचिन बारवकर

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
मावळ, ता. मावळ, जि. पुणे श्री. किशोर घाडगे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १.८.२००७ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ५.९.२००७ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. ३०.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने त्याच दिवशी सुनावणी घेण्यात आली.

मौजे तुंगार्ली, ता. मावळ येथील जागेच्या संदर्भातील नावे कमी करणे व वाढविणे या अनुषंगाने ७/१२ च्या उताऱ्याची माहिती आपण मागितली होती. आपण मंत्रालयात अर्ज केला होता, तो जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, मावळ यांच्याकडे पाठविल्याला पाच वर्षे झाली, तथापि सद्यस्थितीची माहिती दिली जात नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. नरिंदरसिंग चढ्ढा यांनी केले.

श्री. चढ्ढा यांनी माहितीच्या अधिकारात अर्ज केलेला नव्हता तसेच प्रथम अपील केलेले नाही, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, मावळ श्री. किशोर घाडगे यांनी नमूद केले.

श्री. चढ्ढा यांनी माहितीबाबत तहसीलदार, मावळ यांच्याशी सातत्याने पत्रव्यवहार केला आहे. तसेच तहसीलदारांची अनेक वेळा भेट घेऊनही संबंधित विषयाची माहिती आपल्याला दिली जात नसल्याचे म्हटले आहे. सर्व कागदपत्रे सादर करूनही ७/१२ उताऱ्यावरील नोंदीबाबत निर्णय होण्यासाठीची कारणे आपल्याला कळविली जात नाहीत, अशी लेखी व तोंडी तक्रार श्री. चढ्ढा यांनी केली. श्री. चढ्ढा यांच्या मूळ तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची माहिती जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, मावळ श्री. किशोर घाडगे यांनी पंधरा दिवसात श्री. चढ्ढा यांना कळवावे, असे मौखिक आंदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. श्री. चढ्ढा यांना दि. ५.९.२००७ रोजी त्यांचा अर्ज कोणत्या तारखेचा आहे हे कळत नसल्याचे कळविण्यात आले, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, मावळ श्री. किशोर घाडगे यांनी दि. ७.५.२००९ च्या पत्रान्वये आयोगास कळविले. सुनावणीच्या वेळी श्री. घाडगे यांनी या पत्राचा उल्लेख केला नव्हता. दि. ५.९.२००७ नंतर श्री. चढ्ढा श्री. घाडगे यांच्यासह विविध अधिकाऱ्यांना / कर्मचाऱ्यांना भेटले आहेत. आयोगापुढील सुनावणीच्या वेळीही त्यांनी सर्व

हकीकत सांगितली आहे, तरीही श्री. घाडगे हे जुन्या पत्राचा हवाला देऊन तांत्रिक स्पष्टीकरण देतात, हे आक्षेपार्ह व दखलपात्र आहे.

मूळ प्रकरणाचा कोणताही निर्णय करण्यात आलेला नसून आपल्याला समाधानकारक माहिती देण्यात आली नाही, अशी तक्रार श्री. चढ्ढा यांनी दि. १७.८.२००९ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. श्री. चढ्ढा यांची तक्रार ही गंभीर बाब आहे. मूळ प्रकरणाच्या अनुषंगाने केवळ पाठविलेल्या पत्राची प्रत देणे एवढीच कार्यवाही जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार श्री. किशोर घाडगे यांच्याकडून अपेक्षित नव्हती. आयोगाच्या आदेशानुसार कार्यवाही न केल्याबाबतचा खुलासा त्यांनी सादर करणे आवश्यक आहे.

तहसीलदार, मावळ यांनी याची त्वरित दखल घेऊन संबंधित कार्यवाहीच्या अनुषंगाने संपूर्ण माहिती अपीलकर्त्यास त्वरित न दिल्यास ते शास्तीस पात्र ठरतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता श्री. एस. नरिंदरसिंग चढ्ढा यांच्या मूळ तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, मावळ यांनी आठ दिवसात, मूळ तक्रारीच्या निर्गतीसह आयोगास सादर करावा.

३. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, मावळ श्री. किशोर घाडगे यांनी आयोगाच्या आदेशानुसार कार्यवाही न केल्याबाबतचा त्यांचा खुलासा एक आठवड्यात आयोगास सादर करावा.

**पुणे**
**दि. २७.११.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**( विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. सुधीर रघुनाथ पटवर्धन अपीलकर्ता
कृपा बंगला, हॉटेल नागालँड मागे,
सिध्दीविनायक नगर, पंढरपूर, जि.सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचीव,
पंढरपूर एज्युकेशन सोसायटी, पंढरपूर, जि.सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य,
अध्यापक विद्यालय, पंढरपूर, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १९४ / सोलापूर |
| २ | सनावणीची तारीख | २०.११.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. सुधीर रघुनाथ पटवर्धन
कृपा बंगला, हॉटेल नागालँड मागे,
सिध्दीविनायक नगर, पंढरपूर, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सचीव,
पंढरपूर एज्युकेशन सोसायटी, पंढरपूर, जि.सोलापूर श्री. मो.चि.पाठक
ॲड. सुरेश रघुनाथ जोशी,

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्या,
अध्यापक विद्यालय, पंढरपूर, जि. सोलापूर श्रीमती पी. एन.पट्टणकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २९.९.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ३१.१०.२०६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २८.११.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९.१२.२००६ |

माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १९.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. २०.११.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

पंढरपूर एज्युकेशन सोसायटी, पंढरपूर यांच्या सचीव व अध्यक्ष यांनी संस्थेतील संगणक विषय शिकविण्याच्या संदर्भातील माहिती व शैक्षणिक साहित्य शुल्कांच्या पावत्यांच्या छायांकित प्रती दिल्या नाहीत. संगणक प्रशिक्षणाला शासकीय मदत नसली तरी या विषयाचे तास शाळेच्या वेळापत्रकात आहेत. संगणकाचे वर्ग जेथे भरतात त्या अध्यापक इमारतीचे भाडे शासन देते, त्याचे सभागृह शासनाच्या खर्चातून बांधले आहे, इ. बाबी लक्षात घेता, 'संगणक विभाग संस्थेने स्वतंत्ररीत्या केला असल्याने त्याला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही,' हे संस्थेचे म्हणणे योग्य नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. सुधीर रघुनाथ पटवर्धन यांनी केले.

आपल्या कक्षेत येणारी माहिती विहित मुदतीत दिली आहे. अन्य माहिती संस्थेच्या कक्षेतील आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्राचार्या, अध्यापक विद्यालय, पंढरपूर श्रीमती पी.एन. पट्टणकर यांनी केले. जानेवारी २००५ ते सप्टेंबर २००६ या संपूर्ण कालावधीमध्ये अध्यापक विद्यालयात प्रायोगिक स्वरुपात तीन महिन्यांसाठी संगणक विषयाचा प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला. त्यानंतर तो बंद करण्यात आला. त्या संदर्भातील दीर्घकालीन माहिती व स्वतंत्र शुल्क घेतले नसल्यामुळे पावत्यांच्या प्रती देण्याचा प्रश्न उदभवत नाही. तसेच या संदर्भात उभय बाजूंचे दावे सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांच्यापुढे प्रलंबित आहेत, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा सचिव, पंढरपूर एज्युकेशन सोसायटी, पंढरपूर याचे प्रतिनिधी ॲड. सुरेश रघुनाथ जोशी यांनी केले.

श्री. पटवर्धन यांनी मागितलेल्या माहितीच्या अनुषंगाने तपशीलवार अहवाल संस्थेच्या प्रतिनिधींनी सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार

ऑनररी सेक्रेटरी, पंढरपूर एज्युकेशन सोसायटी, पंढरीपूर श्री. नारायण बाळकृष्ण रत्नपारखी, ऑनररी सेक्रेटरी, पंढरपूर एज्युकेशन सोसायटी, श्री. मो.चि. पाठक व प्राचार्य, अध्यापक विद्यालय, पंढरपूर श्रीमती पी.एन.पट्टणकर यांच्या स्वाक्षरीने दि. २४.११.२००८ रोजी अहवाल सादर करण्यात आला. श्री. सुधीर रघुनाथ पटवर्धन हे मे २००५ पर्यंत संस्थेच्या कवठेकर प्रशालेमध्ये मुख्याध्यापक म्हणून कार्यरत होते. तसेच त्यापूर्वी ते २००१ पर्यंत १६ वर्षे संस्थेच्या अध्यापक विद्यालय, पंढरपूर मध्ये प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. त्यामुळे त्यांना अध्यापक विद्यालयाची संपूर्ण माहिती होती. तसेच सध्या त्यांनी धर्मादाय आयुक्त, सोलापूर यांचेकडे संस्थेची नवीन समांतर पदाधिकाऱ्यांची यादी सादर केलेली आहे. त्याचे चौकशी प्रकरण प्रलंबित आहे. त्यामध्ये त्यांचा समावेश सचिव म्हणून त्यांनी केलेला आहे. तसेच संस्थेच्या अनेक शाखांकडे माहिती अधिकार कायद्याच्या आधारे सतत माहिती मागवून ते सतत त्रास देत आहेत. परंतु त्यांनी त्याचा वापर व उपयोग कोठेही केलेला नाही. धर्मादाय आयुक्तांकडे त्यांनी संस्थेला जी माहिती मागितली होती, ती त्यांना मिळाली असून त्याबद्दलचे त्यांचे अपील निकालात काढण्यात आलेले आहे, असे या अहवालात म्हटले आहे.

वरील बाबी लक्षात घेता संस्थांतर्गत वादापोटी माहितीच्या अधिकाराचा वापर करुन उलटसुलट दावे-प्रतिदावे केले जात आहेत, असे स्पष्ट होते. त्याची शहानिशा करणे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अपेक्षित नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २० .११.२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री. संजय शंकर कोळी
स.न.७२/१अ/८, सुयोग कुंज सर्दानका,
समर्थनगर, नवी सांगवी, जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसंचालक,
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,
पुणे विभाग, २८ क्वीन्स गार्डन, पुणे-१ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा संशोधन अधिकारी,
अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,
पुणे विभाग, २८ क्वीन्स गार्डन, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०४५, २०४६ व २०४७/ पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रम | दि.२५.०२.२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०९.०४.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१९.०४.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.०२.०५.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.०९.०७.२००८ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२५.०२.२००९ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त सदर अपिलांचा समावेश करण्यात आला होता. या प्रकरणी दाखल कागदपत्रांचे अवलोकन करता नेमकी

माहिती मागण्याची जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकर्ता श्री.कोळी यांना दिलेली सूचना योग्य आहे.

विशिष्ट प्रकरणांबाबत माहितीची मागणी केल्यास संबंधितांची लेखी परवानगी घेऊन आपणास माहिती देण्यात येईल, असे सविस्तर उत्तर जन माहिती अधिकारी तथा अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी, पुणे विभाग, पुणे-१ यांनी अपीलकर्त्यास त्यांचेकडील पत्र क्रमांक जप्रत/माअ/पुणे-३२/०८/का-१/१४८८, दि.१९.०४.२००८ अन्वये दिले. तसेच, 'कै.गोविंद मोघाजी गारे यांच्या प्रकरणातील माहिती मागविणाऱ्या अन्य अर्जदारांचे बाबतीत या कार्यालयाने कै.गोविंद मोघाजी गारे यांचे चिरंजीव श्री.अतुल गोविंद गारे यांना त्यांच्या वडिलांच्या नस्तीमधील माहिती अर्जदाराला द्यावी किंवा कसे याबाबत विचारणा केली असता, श्री.अतुल गोविंद गारे यांनी त्यांच्या दि.२३.०२.२००७ रोजीच्या पत्रान्वये त्यांच्या वडिलांच्या (कै.गोविंद मोघाजी गारे) जात पडताळणी नस्तीमधील वैयक्तिक माहिती इतर कोणाही त्रयस्थ व्यक्तीस देऊ नये, असे पत्रान्वये कळविले आहे. त्यामुळे त्यांची वैयक्तिक स्वरुपाची माहिती आपणास देता येत नाही. तसेच आपणांस ज्या ज्या प्रकरणांची माहिती हवी असेल त्यांची नावे प्रकरण क्रमांक दिल्यास ती माहिती संबंधितांची लेखी परवानगी घेऊन आपणास उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात येईल'. असेही या उत्तरात म्हटले आहे.

अपीलकर्ता श्री.संजय शंकर कोळी यांचे वडील श्री.शंकर विठ्ठल कोळी यांचा अनुसूचित जमातीच्या दावा समितीचे आदेश दि.१८.०३.२००८ अन्वये अवैध ठरविण्यात आला आहे. वडिलांचा दावा अवैध ठरविल्यानंतर म्हणजेच दि.१८.०३.२००८ नंतर सदरची अपिले श्री.संजय शंकर कोळी यांनी दाखल केली आहेत, असेही जन माहिती अधिकारी श्री.आर.डी.कांडेकर यांनी त्यांच्या निवदेनामध्ये नमूद केले आहे.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे म्हणणे ग्राह्य धरण्यात येत आहे. डॉ.गोविंद मो.गारे (सेवानिवृत्त अपर आयुक्त) यांच्या जातपडताळणी बाबतची वैयक्तिक कागदपत्रे देण्याबाबत जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी,अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,पुणे विभाग, २८ क्वीन्स गार्डन, पुणे यांनी केलेली कार्यवाही योग्य आहे. मात्र डॉ.गोविंद

मो.गारे (सेवानिवृत्त अपर आयुक्त) यांच्या जात पडताळणीविषयक निर्णयाची / प्रमाणपत्राची प्रत अपिलकर्त्यास देणे पारदर्शकतेच्या दृष्टीने आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१) अपील क्रमांक २०४५, २०४६ व २०४७ निकाली काढण्यात येत आहेत.

२) डॉ.गोविंद मो.गारे (सेवानिवृत्त अपर आयुक्त) यांच्या जात पडताळणी प्रमाणपत्राची प्रत अपिलकर्ता श्री. संजय शंकर कोळी यांना जन माहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी,अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,पुणे विभाग, २८ क्वीन्स गार्डन, पुणे यांनी निःशुल्क द्यावी.

पुणे
दि. : ३० - ११ - २००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ